पोलीस अधीक्षक कार्यालय,गडचिरोली,
दिनांक : ०८/०८/२०१८

# <u>वार्तापत्र</u>

## ‘गडचिरोली पोलीस दलातर्फे विकास दौडचे यशस्वी आयोजन’

आज दिनांक ०९ ऑगस्ट रोजी जागतिक आदिवासी दिनानिमित्ताने गडचिरोली पोलीस दलाने आयोजित केलेल्या ‘विकास दौड’ स्पर्धेत गडचिरोली जिल्हयातील विविध पोस्टे/उपपोस्टे/पोमकें स्तरावर या स्पर्धेच्या दृष्टीने व गेल्या १५ दिवसांपासुन घेण्यात आलेल्या स्पर्धेतील प्रथम पाच क्रमांक मिळविलेल्या विद्यार्थी - विद्यार्थीनींसह एकूण ५६५ विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला. त्याचबरोबर केंद्रीय राखीव पोलीस बल १९२ बटालियन च्या जवानांनी देखील सदर स्पर्धेत सहभाग घेतला.

सकाळी ०८.०० वा. इंदिरा गांधी चौक गडचिरोली येथे मा. श्री. टी. शेखर सो., पोलीस उपमहानिरीक्षक, केंद्रीय राखीव पोलीस बल व गडचिरोली जिल्हयाचे पोलीस अधीक्षक मा. श्री. शैलेश बलकवडे यांनी स्पर्धकांना हिरवी झेंडी दाखवून स्पर्धेस सुरवात झाली. सदर स्पर्धेच्या उद्घाटनास मा. अपर पोलीस अधीक्षक श्री. महेंद्र पंडित सो., मा. अपर पोलीस अधीक्षक श्री. मोहितकुमार गर्ग सो. तसेच केंद्रीय राखीव पोलीस बलाचे वरिष्ठ अधिकारी व गडचिरोलीतील नागरिक मोठया संख्येने उपस्थित होते. सदर स्पर्धेची सुरुवात इंदिरा गांधी चौक येथून होवून पोलीस मुख्यालय गडचिरोली येथे सांगता झाली.

स्पर्धेचा बक्षीस समारंभ पोलीस मुख्यालयाच्या मुख्य कवायत मैदानावर पोलीस उपमहानिरीक्षक गडचिरोली परिक्षेत्र मा. श्री. अंकुश शिंदे सो. यांच्या हस्ते पार पडला. यावेळी मुले व मुली यांच्या गटात प्रथम येणाऱ्यास रूपये १०,०००/- रोख, ट्रॉफी व पुष्पगुच्छ, व्दितीस क्रमांकास ७,५००/- रू. रोख, ट्रॉफी व पुष्पगुच्छ, तृतीय क्रमांकास ५,०००/- रू. रोख, ट्रॉफी व पुष्पगुच्छ तसेच दोन्ही गटात प्रत्येकी ३ उत्तेजनार्थ पारितोषिक म्हणून रू. १,०००/- रोख, ट्रॉफी व पुष्पगुच्छ प्रदान करण्यात आले.




गडचिरोली पोलीस दल
९ ऑगस्ट जागतिक आदिवासी दिनानिमित्त



